स्थायी समितीच्या **शुक्रवार** दिनांक 23–12–2011 रोजी दुपारी 12–00 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या स्थगित सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | श्री. संदिप दिवाकर जोशी | अध्यक्ष |
| 2. | श्री. विकास उर्फ बाबा माधवराव मैंद | सदस्य |
| 3. | श्री. दिपक मोहन पटेल | सदस्य |
| 4. | सौ. उषा गोपाल बोहरे | सदस्या |
| 5. | श्री. भारतभूषण ऋषीपंत गायधणे | सदस्य |
| 6. | सौ. मंदाताई उर्फ आक्का गंगाधर लेंडे | सदस्या |
| 7. | श्री. बंडू उर्फ सुधिर हरिदास राऊत | सदस्य |
| 8. | श्री. प्रविण आत्माराम सांदेकर | सदस्य |
| 9. | श्री. अरुण वसंतराव डवरे | सदस्य |
| 10. | श्री. झुल्फेकार अहमद शेख अहमद भूट्टो | सदस्य |
| 11. | सौ. सिंधु रामाजी उईके | सदस्या |
| 12. | सौ. कल्पना सुरेश डवरे | सदस्या |
| 13. | श्री. मोहम्मद कामील अंसारी मो. हसन | सदस्य |
| 14. | डॉ. मिलींद माने | सदस्य |
| 15. | श्री. राहुल सुखदेव तेलंग | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. अरविंदरपाल सिंग उर्फ बब्बी बावा | सदस्य |

## उपस्थित अधिकारी

1) श्री. आर.झेड. सिद्दीकी, उपायुक्त

2) श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

<u>ठराव क्रमांक 190 :–</u> वॉर्ड क्र. 8, मधिल कामठी रोड ते नारा टेलीफोन एक्सचेंज (कामगारनगर रिंग रोड चौक) येथील रस्ते डांबरीकरणाचे रु. 39,87,710/– रकमेचे प्राकलनास पद क्र. 370 अंतर्गत स्थायी समिती ठराव क्र. 141 दिनांक 25.11.2011 नुसार कार्योत्तर प्रशासकीय मंजुरी प्रदान करुन, या कामास्तव प्राप्त 5 निविदांपैकी मे. आर.आर. कन्स्ट्रक्शन यांची प्राकलनिय दरांपेक्षा 7.99 प्रतिशत ने कमी दरांची रु. 36,69,092/– रकमेची निम्नतम निविदा स्विकृतीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 191 :–</u> गोळीबार चौक ते मोतीबाग चॉद हॉटेल पर्यंत रस्त्याचे डांबरीकरणाचे कामास्तव 75,00,000/– रकमेच्या प्राकलनास पद क्र. 370 अंतर्गत स्थायी समिती ठराव क्र. 141 दिनांक 25.11.2011 नुसार कार्योत्तर प्रशासकीय मंजूरी प्रदान करुन, या कामास्तव प्राप्त 4 निविदांपैकी मे. एस.के. गुरुबक्शानी यांची प्राकलनिय दरांपेक्षा 5.04 प्रतिशत ने कमी दरांची रु. 71,22,000/– रकमेची निम्नतम निविदा स्विकृतीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 192 :–</u> वॉर्ड क्र. 19, जरीपटका मधील ख्रिश्चन कब्रस्थान ते चौधरी चौक ते दयानंद पार्क पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरणाचे कामास्तव रु. 49,99,409/– रकमेचे प्राकलन....ास पद क्र. 370 अंतर्गत प्रशासकीय मंजुरी प्रदान करुन, या कामास्तव प्राप्त 5 निविदांपैकी मे. भगतसींग रेहाल, यांची सुधारित प्राकलनिय दरांपेक्षा 5.75 प्रतिशत ने कमी दरांची रु. 47,11,943/– रकमेची निम्नतम निविदा स्विकृतीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन या निविदा काराने (कंत्राटदाराने) या पुर्वीच्या व या आर्थिक वर्षात जी कामे केली किंवा केली नाही. या बाबतचा अहवाल स्थायी समिती समक्ष ठेवावा तो पर्यंत विषय कार्यालयास परत करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 193 :–</u> वॉर्ड क्र. 74, नवाबपुरा येथील आयाचित मंदिर (लाकडी पुल) ते मानीपुरा चौक पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरणसचे रु. 33,39,972/– रकमेच्या सुधारित प्राकलनास पद क्र. 681 अंतर्गत प्रशासकीय मंजुरी प्रदान करुन, या कामास्तव प्राप्त 4 निविदांपैकी मे. एस.के. गुरुबक्षानी यांची मुळ प्राकलनिय दरांपेक्षा 21.24 प्रतिशत ने अधिक तर नविन सी.एस.आर. पेक्षा 9.28 प्रतिशत ने कमी दरांची रु. 30,30,111/– रकमेची सुधारित निम्नतम निविदा स्विकृतीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 194 :–</u> वॉर्ड क्र. 41, मधील कडबी चौक ते मेकोसाबाग आर.ओ.बी. ते श्री.गणेशलाल शाहू यांचे घराजवळील नाल्यापर्यंत आय.आर. डी.पी. रस्त्याची सुस्थिती व दुरुस्तीचे कामास्तव रु. 45,03,427/– रकमेचे प्राकलनास पद क्र. 370 अंतर्गत प्रशासकीय मंजुरी प्रदान करुन, या कामास्तव प्राप्त 5 निविदांपैकी मे. भगतसींग रेहाल यांची सुधारित प्राकलनिय दरांपेक्षा 10.75 प्रतिशत ने कमी दरांची रु. 40,19,309/– रकमेची सुधारित निम्नतम निविदा स्विकृतीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन या निविदा काराने (कंत्राटदाराने) या पुर्वीच्या व या आर्थिक वर्षात जी कामे केली किंवा केली नाही. या बाबतचा अहवाल स्थायी समिती समक्ष ठेवावा तो पर्यंत विषय कार्यालयास परत करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 195</u> :— वॉर्ड क्र. 58, स्मॉल फॅक्टरी एरिया येथे प्रीतम कॉम्प्लेक्स ते हार्दीक लॉन (परमात्मा एक सेवक) पर्यंत रस्त्याचा विकास कामास्तव रु. 47,01,162/— रकमेच्या प्राकलनास पद क्र. 370 अंतर्गत प्रशासकीय मंजुरी प्रदान करुन, या कामास्तव प्राप्त 2 निविदांपैकी मे. अमृता कन्स्ट्रक्शन यांची प्राकलनिय दरांपेक्षा 5 प्रतिशत ने कमी दरांची रु. 44,66,104/— रकमेची निम्नतम निविदा स्विकृतीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 196</u> :— वार्ड क्र. 127 मधील दत्तात्रय प्राथमिक शाळा 'आलाप' बहुउद्देशीय सांस्कृतिक व सामाजिक संस्थेची संगीत विद्यालयासाठी भाडे तत्वावर मिळण्याकरिता मागणी आहे. खोल्या भाडेतत्वावर दयावयाचे झाल्यास याकरिता दोन खोल्याचे भाडे रु. 14628/— निर्धारित करण्यात आले आहे. आलाप बहुउद्देशीय सांस्कृतिक व सामाजिक संस्थेची मागणी लक्षांत घेता व शाळेचा वापर फक्त रात्रकालीन वेळेत (शाळेचा कामकाजाचा वेळ वगळुन) होणार असल्याने निर्धारित भाडे कमी करण्यात यावे किंवा कसे ?

करिता, 1) शाळेच्या दोन खोल्या भाडे तत्वावर देण्यासंबंधीचा उचित निर्णय घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली. 2) दोन खोल्या भाडे तत्वावर दयावयाचे ठरल्यास, भाडे निर्धारित करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन मागणी तीन तासाकरिता असल्यामुळे मासिक भाडे रु. 2000/— एवढे घेण्याच्या अटीवर देण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली

<u>ठराव क्रमांक 197</u> :— नागपूर शहरातील रस्ते यांत्रीकी पध्दतीने भाडेतत्वावर स्वच्छ करण्यासाठी स्थायी समिती ठराव क्र. 72 दि. 03.09. 2011 अन्वये निविदा मागविण्यात आल्या असता मे. स्वच्छता कॉरपोरेशन, बॅगलोर यांचे निम्नतम दर रु. 386/— प्रती कि.मी. व दुसऱ्या वर्षापासुन प्रति वर्ष 8 टक्के वाढ प्राप्त झाले असून त्यानुसार प्रथम चरणात 100 धावते कि.मी. रस्ते स्वच्छ करण्यासाठी होणाऱ्या वार्षीक खर्च रु. 1,40,89,000/— प्रमाणे, पांच वर्षासाठी काम देण्याबाबत व काम समाधानकारक आढळल्यास 3 ते 6 महिन्याच्या दरम्यान अधिकचे काम देण्याबाबत विचार करण्यात येऊन खर्च आय—व्यय पद क्र. 597 किंवा इतर उपलब्ध प्रावधानमधून भागविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 198</u> :— महानगरपालिकेच्या कर आकारणी विभागातील अभिलेखाचे स्कॅन करण्याकरीता निविदा बोलावीली असता प्राप्त पाच निविदापैकी सर्वात कमी दराची मे. डेको फर्न कंन्स्ट्रक्शन यांची प्रतिपान रु. 1.30 दराची प्राप्त निविदा मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 199</u> :— आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

अध्यक्ष
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर